# जाहिरात मसूदा- महापालिका संकेतस्थळ

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका

### विषय - दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या (हंगामी) स्वरुपात पद भरणेबाबत...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बहिणाबाई चौधरी प्राणीसंग्रहालयाचे ठिकाणी दरमाहे एकत्रित मानधनावर खाली नमुद केलेल्या पदांसाठी हंगामी तात्पुरत्या स्वरुपात ६ महिने कालावधीकरीता मुलाखत पध्दतीने नेमणुक करावयाची आहे. सदर पदांचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि अटी खालील प्रमाणे:

**(१) पशुवैदयक :-** **(पदसंख्या – १ )**

**शैक्षणिक अर्हता** – (१) B.V.Sc. & A.H. पदवी.

(२) वन्यजीव शास्त्रातील पदव्योत्तर पदवी असलेस प्राधान्य.

(३) भारतातील मान्यताप्राप्त प्राणिसंग्रहालयात पशुवैद्यक पदावर किमान ३ वर्ष कामकाजाचा अनुभव आवश्यक.

**एकत्रित मानधन-** र.रु. ४५,०००/-

(२) **प्राणीजीव शास्त्रज्ञ तथा शैक्षणिक अधिकारी :-** **(पदसंख्या – १)**

1. Minimum qualification Degree in B.Sc.(Zoology/Enviromental Sciences)
2. Able to speak in languages (English,Hindi & local Language)
3. Teaching certificate or Diploma in Education would be desirable
4. Working knowledge of the principles of conservation education.
5. Experience in conducting educational talks to visitors
6. Understanding of international and national laws pertaining to wildlife.
7. Ability to create graphic interpretations at the zoo or orphanage.
8. Ability to develop and implement education programs for school aged children and adults.

**एकत्रित मानधन-** र.रु. ३०,०००/-

**अटी आणि शर्ती :**

१) मानधनावरील नेमणुका पुर्णपणे तात्पुरत्या हंगामी स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायम पदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही.

२) ज्या दिवशी म.न.पास सदर पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटिशीशिवाय त्यांच्या मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येतील.

३) मुलाखतीस येण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

४) उपरोक्त पदासाठी विहित केलेनुसार तसेच शैक्षणिक अर्हता व कामाच्या अनुभवानुसार मानधन अदा केले जाईल. अर्जासोबत सादर केलेला अनुभव खोटा असल्याचे निदर्शनास आलेस तो अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही.

५) सर्व उमेदवारांनी मुलाखतीसाठी उपस्थित राहतांना शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र व अनुभवाबाबतच्या आवश्यक त्या मुळ प्रती व साक्षांकीत केलेल्या प्रती उदा. गुणपत्रिका (मार्कशिट), सर्टिफिकेट, फोटो, इ. सादर करणे बंधनकारक आहे.

६) निवड केलेल्या उमेदवारांना मनपाने ठरवून दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील. त्याप्रमाणे काम करणेस नकार दिलेस नेमणुक रद्द करणेत येईल.

७) सदर पदांना महाराष्ट्र आरक्षण कायदा २००४ नुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागू राहिल. आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झालेस सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांची नेमणुक करणेत येईल.

८) उमेदवारांना प्राणीसंग्रहालयाच्या कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील, त्यामध्ये कोणतीही सवलत नाही.

९) उमेदवारांची नेमणुक झालेनंतर बायोमेट्रिक पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहील व हजेरी मस्टरवर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय पगार अदा केला जाणार नाही.

१०) निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. सदर नेमणूक प्रक्रिया रद्द / फेरप्रक्रिया करणेचे अधिकार मा. आयुक्तसो यांनी राखून ठेवले आहेत.

तरी इच्छुक उमेदवारांनी अर्जासह बाये-डेटा, शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र व अनुभवाबाबतच्याआवश्यक त्या साक्षांकीत केलेल्या प्रती उदा.गुणपत्रिका (मार्कशिट), सर्टिफिकेट, फोटो, इत्यादी जाहीरात प्रथम प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापसून ७ दिवसांत पशुवैद्यकीय अधिकारी यांचे कार्यालय, पशुवैद्यकीय विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, कै.नारायण मेघाजी लोखंडे सभागृह,गांधीनगर, पिंपरी पुणे ४११०१८ येथे समक्ष पोस्टाने सादर करावेत. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८.